# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** काटोल **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0341 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/05/2019 22:35 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 14/05/2019

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/05/2019

**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/05/2019 **Time (वेळ):** 22:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 043 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2019 22:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हर्ष पान पॅलेस जलालखेडा रोड का,काटोल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मोहम्मद जामिल मोहम्मद ईकबाल

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1980 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

फिर्याद

ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपुर
दिनांक १४/०५/२०१९

मै मोहम्मद जमिल मोहम्मद इकबाल, उम्र ३९ साल, धंदा–परफ्युम शॉप, पता. घर नं. ४१ गांधीगेट, अत्तर ओली हिंदु मुलींची स्कुल के पास, महाल नागपूर मै उपरोक्त दिए हुए पतेपर रहता हु. दि. १३.०५.२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे समक्ष लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

## तक्रार

अॅ.क.ब्यु. नागपूर
दि. १३.०५.२०१९

नाव :– श्री. मोहम्मद जमिल मोहम्मद इकबाल, उम्र ३९ साल, धंदा–परफ्युम शॉप, पता. घर नं. ४१ गांधीगेट, अत्तर ओली हिंदु मुलींची स्कुल के पास, महाल नागपूर मो.नं. ९८२३७४४४४४

मै मोहम्मद जमिल मोहम्मद इकबाल, उम्र ३९ साल, धंदा–परफ्युम शॉप, पता. घर नं. ४१ गांधीगेट, अत्तर ओली हिंदु मुलींची स्कुल के पास, महाल नागपूर मो.नं. ९८२३७४४४४४

मैं ॲन्टी करप्शन ब्युरो में समक्ष आकर रिपोर्ट देता हूँ कि, मैं उपर दिए हुए पते पर अपने परिवार के साथ रहता हूँ और मेरा महाल पे सरताज सुगंध भंडार नाम का खुद का अगरबत्ती और परफ्युम का दुकान हैं।

मेरे दादाजी हाजी हबीबउल्ला इनके नामसे ढवलापूर (हेटी) ता. काटोल जि. नागपूर यहाँ पे खेती है। और उस खेती का रखरखाव करने का जिम्मा मेरे दादाजी मुझे दिया हैं। उस खेती में ईलेक्ट्रीक लाईन कनेक्शन लेने के लिए ऑनलाईन फार्म भर दिया। लेकीन कुछ दिनों बाद मुझे फोन आया कि, म.रा.वि.वि.कं. काटोल ऑफीस मे जाके नई ईलेक्ट्रीक लाईन कनेक्शन के लिए कागजात जमा कर दो।

तारीख ०९.०५.२०१९ को मै काटोल के म.रा.वि.वि.कं. ऑफीस में गया और वहॉके इंजिनियर श्री शर्मा साहब से मिला। तब उन्होंने बोला कि आपका फॉर्म गलत हो गया हैं आपको फॉर्म फिरसे भरना पडेंगा। उसी समय मैने फॉर्म भरके वहाँसे मै अपने खेत मे चला गया। थोडी देर मे वहॉ पे इंजिनियर श्री. शर्मा और लाईनमेन श्री. बुंधाळे और उसके इंजिनियर शर्मा साहब हमारे खेत में आए। और बोले कि आपने अपने खेत में पानी देने के लिए अवैध तरीकेसे लाईन कनेक्शन लिए हैं। इसलीए आपके उपर गुन्हा दाखील हो सकता है। अगर आपके उपर गुन्हा दाखील नही करना है तो ३७,०००/–रू. देने पडेंगे। मैंने उनसे कहॉ कि मैं इतने पैसे आपको दे नही सकता। इंजिनियर शर्मा साहब ने काहॉ कि, गुन्हा दाखील नही करना है तो मुझे और मेरे लाईनमेन श्री. बुंधाळे के लिए २५,०००/–रू. देने होंगे। आप मुझे तारीख १३/०५/२०१९ को मेरे ऑफिस मे आके मिलो ऐसा इंजिनियर श्री. शर्मा ने मुझे कहा। उस के बाद मैं अपने घर वापस आ गया।

मेरे दादाजी के नाम से ढवलापुर (हेटी) स्थित खेती में पानी देने के लिए अवैध तरीके से लिए हुऐ इलेक्ट्रिक लाईन का कनेक्शन लेने पर गुन्हा दाखील नही करने के लिए म.रा.वि.वि.कं. काटोल के इंजिनियर श्री. शर्मा साहब ने खुद के लिए और लाईनमेन श्री. बुंधाळे के लिए रिश्वत के तौर पे मांगे हुए २५,०००/–रू. देने की मेरी बिल्कुल ही इच्छा नहीं है। इसीलीए मैं ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर में म.रा.वि.वि.कं. काटोल के इंजिनियर श्री. शर्मा साहब और लाईनमेन श्री. बुंधाळे के खिलाफ रिपोर्ट दे रहा हूँ। मैने रिश्वत में देने के लिए २५,०००/– रूपये साथ में लाए हैं। म.रा.वि.वि.कं. काटोल के इंजिनियर श्री. शर्मा साहब और लाईनमेन श्री. बुंधाळे के साथ मेरा कोईभी आर्थिक व्यवहार और दुश्मनी नहीं हैं।

यहीं मेरी रिपोर्ट है। मेरे बताए मुताबीक कॉम्प्युटर पें टंकलीखित की गयी है। पढकर देखा, मेरे बताए मुताबीक बराबर हैं।

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन शासकीय पंचांला पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 41,गांधी गेट अत्तर ओली हिन्दू,मुलींची स्कुल के पास,महाल नागपूर,काटोल ,नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | 41,गांधी गेट अत्तर ओली हिन्दू,मुलींची स्कुल के पास,महाल नागपूर,काटोल ,नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9823744444

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उफनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रदिप सुदामा शर्मा | | | 1. 126,शेषराव सावरकर ,द्वारा धंतोली काटोल,काटोल ,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री रविंद्र रामचंद्र बोढाळे | | | 1. 31,सावरगाव रोड,खते ले आउट काटोल,काटोल ,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):

इकीकत अश्या प्रकारे आहे की लोकसेवक श्री.प्रदिप सुदामा शर्मा वय 31 वर्ष पद कनिष्ठ अभियंता काटोल ग्रामिण -2 कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी काटोल ग्रामिण व लोकसेवक ,) श्री. रविंद्र रामचंद्र बोढाळे वय 59 वर्ष पद वरिष्ठ तंत्रज्ञ ग्रामिण -2 कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी काटोल ग्रामिण यांनी आपले लोकसेवक पदाचा दूरूपयोग करून लोकसेवक 1) श्री.प्रदिप सुदामा शर्मा यांनी माझे शेतात पाणी देण्याकरिता अवैधपणे घेतलेल्या विज कनेक्शन बाबत गुन्हा दाखल न करणे करिता त्यांनी रु 25,000/- रु.ची मागणी करून तडजोडीअंती स्वत:करिता व लोकसेवक 2) रविंद्र रामचंद्र बोढाळे यांचे करिता रु 10,000/- रु ची मागणी केली. व स,दर लाच रक्कम लोकसेवक 2) श्री. रविंद्र रामचंद्र बोढाळे यांनी स्वीकारली म्हनुन माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे सदर गून्हा नोंद करून तपासात घेतला

दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी क्र.मी स्वाक्षरी केली व तदनंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी माझ्याकडून लाचकरिता वापरण्यात येणारी रक्कम रू. २५,००० (ज्यात रू. २०००/— दराच्या १२ व रू. ५००/— दराच्या २ चलनी नोटा) घेतल्या त्यावेळी सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली.

सापळा कार्यवाही दिनांक १३.०५.२०१९ रोजी काटोल येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य, शासकीय वाहन क्र. एमएच—३१ ए.जी. ९५५२ ने वेळ १२.१० वा. रवाना झाले व त्यांचे मागोमाग मी माझे चारचाकी वाहनाने रवाना झालो. त्यानंतर वेळ १३.१५ वा. काटोल टोल नाका जवळील मराठा ग्रिन फॅमिली रेस्टॉरेंट जवळ पोहोचलो. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष दोन्ही लोकसेवक यांची लाच रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वेळ १३.३३ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला दोन्ही लोकसेवकांकडे लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह लोकसेवक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, काटोल ग्रामीण नं. २ येथे गेलो असता तेथे इंजिनियर श्री. शर्मा व वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बुंधाळे हे हजर मिळून आले नाही. तेथे विचारले असता ते साईटवर गेले असल्याचे समजले. त्यानंतर वेळ १४.२५ वा. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी इंजिनियर श्री. शर्मा व वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बोढाळे यांचेकडे लाच रकमेची पडताळणी करण्याकरिता थोडया वेळाने परत पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर वेळ १४.४५ वा. इंजिनियर श्री. शर्मा यांचा मला फोन आला व मला त्यांचे कार्यालयात बोलाविले. त्यामुळे पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी इंजिनियर श्री. शर्मा व वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बोढाळे यांची लाच रकमेची पडताळणी करण्याकरिता वेळ १४.५९ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला दोन्ही लोकसेवकांकडे लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह लोकसेवक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, काटोल ग्रामीण नं. २ येथे गेलो असता तेथे इंजिनियर श्री. शर्मा हे हजर मिळून आले. इंजिनियर श्री. शर्मा यांनी मी माझे शेतात पाणी देण्याकरिता अवैधपणे घेतलेल्या विज कनेक्शनबाबत गुन्हा दाखल न करण्याकरिता त्यांनी स्वतःकरिता व वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बोढाळे यांचेकरिता रू. २५,०००/— ची मागणी करून तडजोडीअंती रू. १०,०००/— ची मागणी केली व सदर लाच रक्कम वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बोढाळे यांचेकडे देण्याचे सांगीतले. त्यानंतर वेळ १५.५० वा. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून इंजिनियर श्री. शर्मा यांनी माझे शेतात पानी देण्याकरिता अवैधपणे घेतलेल्या विज कनेक्शनबाबत गुन्हा दाखल न करण्याकरिता त्यांनी रू. २५,०००/— ची मागणी करून तडजोडीअंती रू. १०,०००/— ची मागणी केली व सदर लाच रक्कम वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बोढाळे यांचेकडे देण्याचे सांगीतल्याची खात्री केली. त्यानंतर मी इंजिनियर श्री. शर्मा यांना फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही त्यामुळे वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. बोढाळे यांना फोन केला परंतु त्यांनी सुध्दा फोन उचलला नाही. त्यामुळे पुढील सापळा कार्यवाही दि. १४.०५.२०१९ रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर मी, पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, सापळा पार्टीतील सर्व सदस्य व दोन्ही पंच कार्यालय अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर येथे परत आलो. त्यानंतर इंजिनियर श्री. शर्मा यांनी लाच रक्कम रू. १०,०००/— मागणी केल्याप्रमाणे मी दि. १३.०५.२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात सापळा कार्यवाहीकरिता जमा केलेली लाच रक्कम रू. २५,०००/— मधुन लाच रक्कम रू. १०,०००/— वेगळे करून एका लिफाफ्यात ठेवण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पुढील सापळा कार्यवाही दि. १४.०५.२०१९ रोजी करण्याचे ठरवून दि. १४.०५.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता याच कार्यालयात येण्यास सांगीतले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SATISHSINGH RANJITSINGH RAJPUT(I (Inspector)) / **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

For

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): SATISHSINGH RANJITSINGH
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

मी दिनांक १४.०५.२०१९ रोजी १०.०० वा. कार्यालय अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर येथे हजर आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य, शासकीय वाहन क्र. एमएच–३१ ए.जी. ९५५२ ने वेळ १०.१५ वा. रवाना झाले व त्यांचे मागोमाग मी माझे चारचाकी वाहनाने रवाना झालो. त्यानंतर वेळ ११.२० वा. काटोल टोल नाका जवळील मराठा ग्रिन फॅमिली रेस्टॉरंट जवळ पोहोचलो.

पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी माझ्या डोक्याच्या केसावरून हात फिरविण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अॅथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रू. १०,०००/– (ज्यात रू. २०००/– दराच्या ५ चलनी नोटा) माझे जिन्सपॅन्टच्या उजव्या खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर वेळ ११.३४ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकून पंच क्र. १ यांचेसह माझे चारचाकी वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, काटोल ग्रामीण नं. २ येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो माग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत, काटोल ग्रामीण येथे गेलो. त्याठिकाणी इंजिनियर लोकसेवक श्री. शर्मा हजर होते. त्यांचेशी बोलणी केली परंतु ते घाईत असल्याने कार्यालयातुन निघून गेले. त्यानंतर वरीष्ठ तंत्रज्ञ लोकसेवक श्री. बोढाळे यांचेशी लाच रक्कम रू. १०,०००/– विषयी बोलणी झाली व ते मला कार्यालयाचे बाजुला असलेल्या हर्ष पान पॅलेस येथे घेवून गेले. त्यांनी लाच रक्कम रू. १०,०००/– हर्ष पान पॅलेस येथे ठेवण्यास सांगीतल्यावरून मी लाच रक्कम रू. १०,०००/– हर्ष पान पॅलेस येथे एका वर्तमानपत्राचे खाली ठेवली. त्यानंतर लोकसेवक श्री. बोढाळे तेथुन निघून गेले व मी हर्ष पान पॅलेस येथेच थांबुन होतो. थोडयाच वेळात लोकसेवक श्री. बोढाळे हर्ष पान पॅलेस येथे आले व लाच रक्कम रू. १०,०००/– हर्ष पान पॅलेस येथे वर्तमानपत्राचे खाली ठेवलेली लाच रक्कम स्विकारली. सापळा पथकास मी माझे डोक्याचे केसावरून हात फिरवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक श्री. बोढाळे यास हर्ष पान पॅलेस येथे रंगेहात पकडले. त्यानंतर पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. लोकसेवक श्री. शर्मा हे हजर नसल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले नाही. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर व सापळा पार्टीतील सदस्य यांनी लोकसेवक श्री. शर्मा यांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेतले. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक १) श्री. प्रदीप सुदामा शर्मा वय ३१ वर्ष पद– कनिष्ठ अभियंता काटोल ग्रामीण–२ कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी काटोल ग्रामीण व लोकसेवक २) श्री. रविंद्र रामचंद्र बोढाळे वय ५९ वर्ष पद–वरीष्ठ तंत्रज्ञ ग्रामीण–२ कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी काटोल ग्रामीण यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून लोकसेवक १) श्री. प्रदीप सुदामा शर्मा यांनी माझे शेतात पाणी देण्याकरिता अवैधपणे घेतलेल्या विज कनेक्शबाबत गुन्हा दाखल न करण्याकरिता त्यांनी रू. २५०००/– ची मागणी करून तडजोडीअंती स्वत:करिता व लोकसेवक २) श्री. रविंद्र रामचंद्र बोढाळे यांचेकरिता रू. १००००/– ची मागणी केली व सदर लाच रक्कम लोकसेवक २) श्री. रविंद्र रामचंद्र बोढाळे यांनी स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. सही मराठीत मो. जमिल वरील फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदर गुन्हा नोंद करुन तपासात घेतला सदर गुन्हयाची डायरी पुढील तपास कामी पोलीस निरीक्षक फाल्गुन घोडमारे अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपुर यांना देण्यात आली

समक्ष

(फाल्गुन घोडमारे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)